महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पुढील तीन वर्षामध्ये (जून,२०१५ ते जून,२०१८) १ लाख विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन परिपत्रक क्र.मग्रारो-२०१५/प्र.क्र.८३/मग्रारो-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३१ जुलै, २०१५

वाचा :-

१) नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णय क्र.मग्रारो- २०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दिनांक १७ डिसेंबर,२०१२
२) नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक क्र.मग्रारो-२०१४/प्र.क्र.४५/मग्रारो-१, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४
३) शासन पत्र क्र.मग्रारोहयो-२०१४/प्रक्र.७३/ रोहयो-१, दिनांक १९ जानेवारी, २०१५
३) नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक क्र.मग्रारो-२०१५/प्र.क्र.०७/मग्रारो-१, दिनांक ७ मार्च,२०१५
४) शासन पत्र मग्रारो-२०१४/ प्र.क्र.४५/रोहयो-७ दिनांक २० मे,२०१५
५) शासन पत्र क्र.मग्रारो-२०१५/प्र.क्र.५५/मग्रारो-१, दिनांक २६ मे,२०१५

परिपत्रक-

महात्मा गांधी नरेगा योजनेअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरी दिनांक १७ डिसेंबर,२०१२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात येतात. त्यानुसार लाभार्थ्यास विहिरीकरिता रु. ३ लक्ष इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. या योजनेअंतर्गत राज्यांमध्ये मोठया प्रमाणात विहिरींची कामे हाती घेण्यात येतात. राज्यात मागील काही वर्षापासून अपुऱ्या व अनियमित पावसामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यावर उपाययोजना म्हणून विहिरी, शेततळे इत्यादीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. विधानमंडळाच्या सन २०१५ च्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनामध्ये मा. मुख्यमंत्री महोदय यांनी शेतक-यांना शाश्वत सिंचनाची सोय विकेंद्रित पाणीसाठयाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासन दिले आहे.

२. यानुषंगाने महात्मा गांधी नरेगा अंतर्गत पुढील तीन वर्षात (जून, २०१५ ते जून, २०१८) १ लक्ष सिंचन विहिरी पूर्ण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी पुढील तीन वर्षामध्ये १ लक्ष सिंचन

अ) महात्मा गांधी नरेगाअंतर्गत १ लक्ष सिंचन विहिरींचे विभागनिहाय वाटप खालीलप्रमाणे-

विभाग	**पुढील तीन वर्षात विहिरी पूर्ण करण्याचे नियोजन**			**अपेक्षित खर्च रु.कोटी (रु.३ लक्ष/विहिर प्रमाणे)**
	२०१५-१६	**२०१६-१७**	**२०१७-१८**	
१	२	३	४	५
कोकण	५००	५००	५००	४५
नाशिक	४५००	५५००	५५००	४६५
औरंगाबाद	९५००	११५००	११५००	९७५
नागपूर	४५००	५५००	५५००	४६५
अमरावती	७०००	७०००	७०००	६३०
पुणे	४०००	५०००	५०००	४२०
एकूण	**३००००**	**३५०००**	**३५०००**	**३०००**

ब) संबंधित विभागीय आयुक्त यांनी अवर्षणप्रवण व कोरडवाहू क्षेत्रास प्राधान्य देवून विहिरींचे जिल्हानिहाय वाटप करावे व त्याप्रमाणेच जिल्हाधिकारी यांनीसुद्धा अवर्षणप्रवण व कोरडवाहू क्षेत्रास प्राधान्य देवून विहिरींचे तालुकानिहाय वाटप करावे. तसेच याबाबत शासनास अवगत करावे.

क) विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागाअंतर्गत उपरोक्त उद्दिष्टाप्रमाणे विहिरी पुर्ण करण्याचा नियोजित कालबद्ध कार्यक्रम तयार करावा व याबाबत संबंधित जिल्हयांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

ड) विहिरींच्या कामासंदर्भात आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपुर यांनी सनियंत्रण करावे तसेच याबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. त्यासाठी विभागनिहाय/ जिल्हानिहाय बैठका, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग तसेच प्रशिक्षण यांचे आयोजन करण्यात यावे.

इ) संदर्भ क्र.४ येथील दिनांक २० मे,२०१५ च्या पत्रान्वये सन २०१५-१६ च्या लेबर बजेटमध्ये सिंचन विहिरींसाठी करण्यात आलेल्या २० टक्के तरतुदीच्या मर्यादेत उपरोक्त विहिरींची कामे करावीत. तसेच शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या निदेशानुसार कार्यवाही करावी.

फ) महात्मा गांधी नरेगा अंतर्गत विहिरींची कामे घेताना संदर्भांकित शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर, २०१२ व शासन परिपत्रक दिनांक २१ ऑगस्ट,२०१४ मधील तरतुदींचे पालन करावे.

३. अपुर्ण विहिरींचे कामे पुर्ण करण्यासाठी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक दिनांक ७ मार्च,२०१५ मधील खालील अतिरिक्त सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी-

१. विहिरींची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी १०० अपूर्ण विहिरींमागे १ जादा कंत्राटी अधिकारी व ५०० पेक्षा जास्त अपुर्ण विहिरींसाठी ५ जादा कंत्राटी अधिकारी नेमावा.

२. मजुरी साहित्याच्या गुणोत्तरा बाबत प्रशिक्षण देण्यात यावे.

३. विहीरीच्या बांधकामात अनुज्ञेय यंत्राचा वापर शासन पत्र क्र.मग्रारोहयो-२०१४/प्रक्र.७३/ रोहयो-१, दिनांक १९ जानेवारी,२०१५ नुसार बांधकाम करताना लाभार्थ्यांच्या इच्छेनुसार UCR व Cement Concrete प्रमाणे कामे करावीत.

४. तसेच पाणी उपसण्यासाठी Pump set, कठीण खडक खोदण्यासाठी Tractor mounted compressor hammer आणि lifting device/chain pulling (स्वयंचलित) या यंत्रांचा वापर करावा.

५. लाभार्थ्यांसाठी साहित्य पुरवठा पद्धत लागू करण्यात यावी.

६. ग्रामपंचायतीला/इतर यंत्रणेला कुशल खर्चासाठी २५ टक्के अग्रीम देण्याची पद्धत लागू करावी.

७. दिनांक २६ मे,२०१५ च्या आदेशानुसार निश्चित केलेल्या जिल्हानिहाय कुशल खर्चाच्या उद्दिष्टाचा पुरेपुर वापर करण्यात यावा.

८. पाच पोलच्या आत विद्युतपुरवठा उपलब्ध असण्याची अट शिथिल करण्यात आली आहे.

९. सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा किंवा MJP यांच्यापैकी आवश्यक दरसूचीचा वापर करून अंदाजपत्रक तयार करावे.(शासन निर्णय दिनांक १७ डिसेंबर,२०१२ च्या कमाल मर्यादेस अधीन राहून)

१०. किमान ५०% कामे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात यावीत व आवश्यकता भासल्यास उर्वरित कामे संबंधित यंत्रणा मार्फत करण्यात यावीत. यासाठी महात्मा गांधी नरेगाच्या मार्गदर्शक सुचनाचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच यंत्रणेमार्फत मजुरी साहित्याचे ६०:४० चे प्रमाण जिल्हास्तरावर ठेवावे लागेल. इतर यंत्रणेसाठी सुद्धा १०० सिंचन विहीरींच्या मागे १ जादा तांत्रिक कंत्राटी अधिकारी तात्पुरत्या स्वरुपात नेमता येईल.

११. विहिरीची कामे घेताना मजुरी व साहित्याचे ६०:४० प्रमाण ग्रामपंचायतस्तरावर/जिल्हास्तवर राखताना इतर मजुरप्रधान कामे घ्यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. विमला)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

31/1/2015

प्रत-

मा.राज्यपालांचे सचिव

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा .मंत्री यांचे खाजगी सचिव

H - 1334-2

मुख्य सचिवांचे स्वीय सहायक

अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव (ग्राम विकास), मंत्रालय, मुंबई-३२

सचिव (रोहयो), मंत्रालय, मुंबई-३२

आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर

सर्व विभागीय आयुक्त

संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व

सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व

सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)

सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे

कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

(महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)

सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो.१)

— oXo —